Estd: 1962

"A++" Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

परिपत्रक

तातडीचे व महत्तवाचे

**विषय :-** शैक्षणिक वर्ष 2023-24 चे Annual self Appraisal Report (ASAR विहित वेळेत सादर करण्याबाबत.

**संदर्भ :-** कार्यालयीन परिपत्रक क्रमांक एसयु/आस्थापना/पी.जी/1144, दि. 07/10/2019.

विद्यापीठ अनुदान आयोगाची दि.18/07/2018 रोजीची अधिसूचना व 7 वा वेतन आयोगाच्या अनुषगांने महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र. एमआयएससी- 2018/सीआर 56/18/युएनआय-1, दि. 08 मार्च, 2019 व त्या संबधिचे शुध्दीपत्रक दि. 10 मे, 2019 नुसार Annual self Appraisal Report (ASAR) नमुने (Proforma) तयार करण्यात आले असून त्यास विद्यापीठ अधिकार मंडळाने मान्यता दिलेली आहे, हे यापूर्वी कळविण्यात आले आहे.

शैक्षणिक वर्ष 2019-20 पासूनचे Annual self Appraisal Report (ASAR) सदर नुमन्यांमध्ये सादर करण्याबाबत या विभागाच्या संदर्भीय परिपत्रक क्रमांक एसयु/आस्थापना/पी.जी./1144, दि. 07/12/2019 रोजीच्या परिपत्रकाव्दारे सर्व संबधित शिक्षकांना कळविण्यात आले आहे. शैक्षणक वर्ष 2023-24 चे Annual self Appraisal Report (ASAR) सदर नुमन्यांमध्ये भरून दि. 25/06/2024 पर्यत सादर करण्यात यावेत.

याबाबत पुन:श्च स्मरणपत्र, परिपत्रक किंवा कोणताही वैयक्तिक पत्र व्यवहार करण्यात येणार नाही. विहीत वेळेत अहवाल सादर न करणाऱ्या शिक्षकांच्या बाबतीत विद्यापीठ परिनियम व शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कुलसचिव

जा.क्रं. एसयु/आस्थापना/पी.जी./3104
दिनांक: 14 JUN 2024
प्रति,
अधिविभागप्रमुख/संचालक/समन्वयक.
सर्व अधिविभाग, केंद्र, स्कूल (प्रशाळा) व अध्यासने,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

- / सदरचे परिपत्रक सर्व संबधित शिक्षकांच्या व शिक्षक समकक्ष सेवकांच्या निदर्शनास आणावे. सर्वांची नावासह स्वाक्षरी घ्यावी व परिपत्रक निदर्शनास आणल्याबाबत कार्यालयास उलट टपाली परिपत्रक र्निमित झाल्यापासून ०५ दिवसात कळवावे.